विशेष असाधारण रजा योजना
मंजुरीबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग
निर्णय क्रमांक :अरजा-२४०२/२५/सेवा-८
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक २५ ऑगस्ट, २००३.

संदर्भ- शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/
वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर २००१.

## निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:अरजा-२४०२/२५/सेवा-८, दिनांक ७ ऑक्टोबर २००२ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना "विशेष असाधारण रजा योजना" लागू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत कर्मचाऱ्याने मागितलेली रजा मंजूर करण्याच्या संबंधात शासन खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे:-

२. ज्या कर्मचाऱ्यांनी विशेष असाधारण रजेची मागणी केलेली आहे त्या कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची विशेष असाधारण रजा सरसकट नामंजूर करण्यात येऊ नये. तथापि, मागणी केलेली विशेष असाधारण रजा मंजूर केल्यामुळे रिक्त होणारे पद हे उच्चस्तरीय सचिव समितीने मान्य केलेल्या आकृतिबंधाच्या चौकटीत बसत असल्यास व असा आकृतिबंध संबंधित विभागाने शासन निर्णयाद्वारे निश्चित केला असल्यास अशा रिक्त होणा-या पदाबाबतची मागणी वित्त विभागाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे करावी. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे अशी मागणी करताना वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयास जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-३ (क) मधील विहित विवरणपत्रामध्ये माहिती पाठवावी. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून समकक्ष कर्मचारी/अधिकारी उपलब्ध झाल्यास विशेष असाधारण रजेच्या कालावधीपर्यंत केवळ तात्पुरत्या स्वरुपात बदलीने सदर पद/पदे भरण्यात यावीत. विशेष असाधारण रजेचा कालावधी संपल्यानंतर अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून उपलब्ध झालेले समकक्ष कर्मचारी/अधिकारी पुन्हा अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे परत करण्यात यावेत. विशेष असाधारण रजेच्या कालावधीत अतिरिक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे मासिक वेतन व भत्ते ज्या कार्यालयात त्यांची केवळ तात्पुरत्या स्वरुपात बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे त्या कार्यालयाने काढावे. विशेष असाधारण रजेच्या कालावधीत

रिक्त होणारे पद/पदे प्रशासकीय दृष्टिकोनातून तात्पुरत्या स्वरुपात बदलीच्याद्वारे अतिरिक्त संवर्ग कक्षामधील उपलब्ध कर्मचारी/अधिकाऱ्यांमधूनच भरण्यास विशेष असाधारण रजा मंजूर करणारे अधिकारी सक्षम राहतील.

३. सदरहू आदेश हे वित्त विभागाच्या वित्तीय सुधारणा कार्यासन (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३७८/०३ /वि.सु.-१,दिनांक ३०.४.२००३) व सामान्य प्रशासन विभाग (अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९८९/प्र.स./सेवा, दिनांक ३.५.२००३) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त चौधरी,
शासनाचे उप सचिव

प्रति,